अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

मंगळवार, दि. २३ ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३२४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## सोलापूर-पुणे रोडवरील कार अपघातात चिमुकलीसह महिला जागीच ठार

✔ **सोलापूर** : सोलापूर-पुणे महामार्गावर पुण्याकडे निघालेल्या होंडा सिटी कार विरुद्ध दिशेला पलटी खात जाऊन सोलापुरकडे निघालेल्या इनोव्हा कार व कंटेनरला धडकल्याने झालेल्या अपघातात एक विवाहित तरुणी जागीच मयत झाली.तसेच एक चिमुकली मुलगी मयत झाली तर पाचजण जखमी झाले. हा अपघात सोमवारी दुपारी ४.३० वा.सुमारास भोइंजे पाटीजवळ (ता.माढा) येथे घडला.

होंडा सिटी कार(क्र. एम.एच-१२आर.के-४७५४) ही कार पुण्याकडे निघाली होती.या कारवरील नियंत्रण सुटल्याने ती दुभाजकावरून पलटी होत विरुद्ध दिशेला गेली.नंतर ती सोलापूरकडे निघालेल्या कंटेनरला (क्र-एम.एच-१२ टी.व्ही-६५७८) व इनोव्हा कारला (क्र-एम.एच.१३-ए.झेड-२५२९) धडकली. या अपघातात माधुरी मल्लिनाथ चितकोटी (वय-३०) रा.सोलापूर ही जागीच मयत झाली.तर सानवी मयूर पाटील (वय-७ ) ही पंढरपूर येथे उपचारा दरम्यान मयत झाली.तसेच मयूर मल्लिनाथ पाटील (वय-३३),संगीता मयूर पाटील (वय-३०) व मीरा मल्लिनाथ चितकोटी (वय-३) तसेच एनोव्हा कर मधील सलीम सय्यद (वय-३०) व दिलीप गायकवाड (वय-७०, सर्वजण रा.सोलापूर) हे जखमी झाले आहेत. जखमींना पंढरपूर येथे व किरकोळ जखमींना टेंभुर्णी येथे दाखल केले. या अपघातात होंडा सिटी कारचा चेंदामेंदा झाला आहे.अपघात समजताच टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील एएसआय अभिमान गुटाळ,पोहेकॉ मकबूल तांबोळी, पोकॉ प्रसाद काटे व हायवे स्टाफच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी जखमींना उपचारास पाठविले.

# पंढरपूर हादरले...

# प्रेम प्रकरणातून मित्रांनीच मित्राला संपवले, गळा दाबून, दगड बांधून प्रेत विहिरीत टाकले

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुका सोमवारी हादरून गेला. प्रेम प्रकरणातून दोघा मित्रांनी त्यांच्याच एका मित्राला जीवनातून संपवून टाकले. या दोन मित्रांनी केलेला क्रूरपणा मन विषण्ण करणारा होता. 'त्या' मित्राचा गळा दाबून खून केला व मृतदेह विहिरीत फेकून दिला. वाखरी गावाच्या हद्दीत हा प्रकार उघडकीस आला. वाखरी गावाच्या हद्दीतील एका विहिरीत पंचवीस वर्षीय तरुणाचा मृतदेह दोन्ही हात बांधून व कंबरेला दगड बांधलेल्या अवस्थेमध्ये आढळून आल्याने खळबळ उडाली. या प्रकरणी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. पंढरपूर ग्रामीण पोलीस आणि पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाला पाच तासात गुन्हा उघडकीस करण्यात यश आले.या प्रकरणी दोघा खुनी मित्रांना अटक करण्यात आली आहे.

## पोलिसांनी अवघ्या पाच तासात लावला छडा; दोघा खुनी मित्रांना केले जेरबंद



दरम्यान सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास वाखरी हद्दीत राहणारे याकुब शेख यांना आपल्या शेतातील विहिरीबाहेर एक चप्पल आढळून आली. यामुळे त्यांनी विहिरीत पाहिले असता पाण्यात लखन गांडुळेचा मृतदेह आढळून आला. पोलिसांशी संपर्क साधल्यावर लखनचा मृतदेह बाहेर काढला असता त्याच्या कंबरेला नॉयलनची दोरी बांधून त्याला दगड बांधल्याचे आढळून आले तसेच त्याचे दोन्ही हात देखील दोरीने बांधले होते. लखनचा भाऊ शंभु गांडुळे याने सदर मृतदेह ओळखला. मृतदेहाची ओळख पटताच उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम व ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी तातडीने तपासाची सूत्रे हलवून त्याच्या दोन मित्रांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कसून चौकशी केली असता त्यांनी सर्व घटनाक्रम नमूद केला. मृतदेह सापडल्यापासून अवघ्या पाच तासात या खुनाचा उलगडा करण्यात आला.

लखन सुनील गांडुळे असे मृत तरुणाचे नाव असून तो पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील राहणार होता. दरम्यान या प्रकरणी प्रकरणी युवराज सातपुते व तुषार मेटकरी या त्याच्या दोन मित्रांना ताब्यात घेण्यात आले आहे. मागील भांडणाच्या रागातून या दोघांनी लखनचा गळा दाबून खून केला असल्याची प्राथमिक माहिती आहे. लखन गांडुळे याचे युवराज बरोबर भांडण झाले होते. दोघांचे भांडण प्रेम प्रकरणावरून झाले होते. सदर वाद मिटविण्यात आल्यानंतर युवराज व तुषार बरोबर लखन गांडुळे हा चहा पिण्यासाठी गेला होता. या ठिकाणी त्यांचा पुन्हा एकदा वाद झाला. यावरून लखनचा गळा दाबून खून करण्यात आला. याची कोणाला माहिती कळू नये म्हणून या दोघांनी गावातून दोन दोऱ्या आणल्या व लखनच्या हाताला बांधून तसेच कमरेला दगड बांधून त्याचा मृतदेह विहिरीत टाकून दिला.

सदरचा गुन्हा उघड करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सी. व्ही केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय आसबे, राजेश गोसावी, पोहेकॉ सुरज हेंबाडे, शरद कदम, बिपीन ढेरे, पोलीस नाईक सचिन इंगळे, सुनील बनसोडे, दादा माने, राकेश लोहार, शोएब पठाण, सचिन हेंबाडे, सुजीत जाधव, पोकॉ समाधान माने, अरबाज खाटीक तसेच सायबर शाखा सोलापूर ग्रामीणचे पोकॉ अन्वर आतार यांनी या गुन्ह्याचा छडा लावला.



## गावे स्वच्छ ठेवण्यासाठी रोहयोतून प्रत्येक ग्रामपंचायतीला चार मजूर द्यावेत

### रोहयो मंत्री संदिपान भूमरे यांच्याकडे सरपंच परिषदेची मागणी

✔ **बार्शी** : गावे स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला रोजगार हमी योजनेतून चार मजूर उपलब्ध करून द्या, अशी आग्रही मागणी सरपंच परिषदेने रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांच्या मुंबई येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीत केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे प्रदेश सरचिटणीस विकास जाधव, यांचे नेतृत्वाखाली व राज्य विश्वस्त राजाराम पोतनीस, प्रदेश प्रशिध्दी प्रमुख बापू जगदाळे अनगर जिल्हाध्यक्ष आबासाहेब सोनवणे, अंबादास गुजर, दयानंद पाटील, नांदेड प्र.जिल्हाध्यक्ष नारायण कदम, संदीप देशमुख, चंद्रशेखर साके, मनीषा यादव, श्रीकांत पाटील, जळगावं प्र.जिल्हाध्यक्ष बाळू धुमाळ, राजमल भगत, युवराज डोळे उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत गावातील शाळा, अंगणवाडी, सांस्कृतिक सभागृह, वृक्ष लागवड यासाठी स्वच्छता मजूरांची आवश्यकता व्यक्त करण्यात आली, यामुळे गावात स्वच्छता राहील. गावे रोगराई पासून मुक्त होतील, त्याच प्रमाणे पाणंद रस्त्यांची संख्या वाढवावी, पूर्वी मंजूर केलेली कामे तात्काळ सुरू करावेत आदी मागण्या मांडण्यात आल्या. यावेळी विकास जाधव यांनी महाविकास आघाडीचे सरकार असताना आपल्याकडे रोहयो मंत्री पद होते त्याकाळात मंजूर केलेली कामे तात्काळ सुरू करण्यात यावी कामे मंजूर करून घेण्यासाठी सरपंचांना खूप प्रयत्न करावे लागतात त्यामुळे सदर कामांना गती मिळावी अशी मागणी केली यावर मंत्री भूमरे यांनी तात्काळ आदेश देऊ असे आश्वासन दिले.

तसेच स्वच्छ भारत मिशन यशस्वी करण्यासाठी गावात स्वच्छतेसाठी मनरेगा या योजने मधून कामगार नेमणे गरजेचे आहे यावर भर दिला. यावरही मंत्री भूमरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

## आहेरवाडी येथे बंदुकीने गोळ्या झाडून खून; चौघांना जन्मठेपेची शिक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

चुलत बहिणींच्या शेतातील वाद आमच्या संमती शिवाय परस्पर का मिटवला या कारणावरून दिवसा बंदुकीतून गोळ्या झाडून चुलत भावाचा खून केल्याच्या आरोपावरून बप्पू ऊर्फ शरणाप्पा शिवानंद दिंडोरे (वय २८) त्याचे वडील शिवानंद महादेव दिंडोरे (वय ५४), दोन चुलते बसवराज महादेव दिंडोरे (वय ४९) आणि सिध्दाराम महादेव दिंडोरे (वय ४८ सर्व रा. आहेरवाडी ता.दक्षिण सोलापूर) यांना जन्मठेप आणि प्रत्येकी २ हजार रुपये दंड अशी शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश रेखा एन.पांढरे यांनी आज सोमवारी ठोठावली.तसेच मयताच्या वारसदारांना प्रत्येकी २ लाख रुपये आरोपींनी द्यावे असेही निकालात नमूद केले आहे.



या खटल्याची पार्श्वभूमी अशी आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथील दिंडोरे वस्तीत मल्लिकार्जुन दिंडोरे हे डीसीसी बँक (सुलेरजवळगे) येथे कार्यरत होते. त्यांची बहीण भागीरथी बाके यांच्या जमिनीचा वाद होता. तो वाद त्यांच्या सख्या भावांनी परस्पर मिटविला होता. त्यामुळे भावकीतील आरोपी त्यांच्यावर चिडून होते. घटनेच्या दिवशी म्हणजेच १९ मार्च २०१७ रोजी दुपारच्या सुमारास मल्लिकार्जुन दिंडोरे हे आपल्या वस्तीवर आई,भाऊ आणि बहीण भागीरथी यांच्या सोबत बसले होते. त्यावेळी वरील चौघे आरोपी शस्त्रानिशी घटनास्थळी आले. आणि त्यांनी भागीरथी बाके हिच्या जमिनीचा वाद तुम्ही परस्पर का मिटविला? आता तुम्हाला ठारच मारतो असे म्हणत बप्पू ऊर्फ शरणप्पा दिंडोरे याने सोबत आणलेल्या १२ बोअरच्या बंदुकीतून गोळ्या झाडल्या.तर अन्य तिघेजण त्याला चिथावणी देत होते. बंदुकीतील गोळी मल्लिकार्जुन धोंडप्पा दिंडोरे (वय ४२) यांना लागली. रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर त्यांना गंभीर अवस्थेत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.उपचारा दरम्यान ते २१ मार्च रोजी मयत झाले. या घटनेची फिर्याद मयत मल्लिकार्जुन यांचे मोठे बंधू मधुकर धोंडप्पा दिंडोरे यांनी वळसंग पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी चौघांविरुद्ध खून आणि शस्त्र अधिनियमाचा गुन्हा दाखल आरोपींना अटक केली.



जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपी पैकी बप्पू ऊर्फ शरणप्पा दिंडोरे हा घटनेच्या वेळी उपसरपंच होता. त्याने २०१४ साली सिद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्या मोटारीवर बंदुकीतून गोळ्या झाडल्या होत्या. काडादी हे आपल्या चार चाकी वाहनातून कारखाना ते प्रेसच्या दिशेने निघाले होते. हत्तुरे वस्तीजवळ बप्पू दिंडोरे याने त्यांच्या मोटारीवर गोळी झाडली होती. या प्रकरणात त्यावेळी विजापूर नाका पोलिसात त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला होता.

तत्कालीन सहाय्यक निरीक्षक इंद्रजीत वर्धन यांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपपत्र न्यायालयास सादर केले होते. या खटल्यात सरकार तर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी ६ साक्षीदार फुटले. मूळ फिर्यादीची साक्ष, शवविच्छेदनाचा अहवाल, बॅलेस्टिक एक्सपोर्टची साक्ष आणि सरकारी पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सर्व आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. खटल्यात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी तर आरोपीतर्फे ॲड प्रशांत देशमुख, ॲड.व्ही.डी.फताटे, ॲड लोंढे-पाटील, आणि ॲड रिसबुड यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून हवालदार शीतल साळवे यांनी सहकार्य केले.

## कामाचे पैसे देतो म्हणून बोलावले, हात बांधून दोन मजुरांना बदडले

### भुताष्टेतील चौघांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : माढा तालुक्यातील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मजुरीचे पैसे घेण्यासाठी बोलावून दोन्ही मजुरांचे हात बांधून त्यांना दोरी व हाताने बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेचा व्हिडिओ समोर आला.त्यातील अमानुष प्रसंग पाहून सोलापूर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली.माढा तालुक्यातील भुताष्टे या गावात ही घटना घडली.

दोन मजुरांना कामाचे पैसे घेण्यासाठी येण्याचा निरोप पाठवला. आपल्याला कामाचे पैसे मिळणार याचा आनंद या मजुरांच्या चेहऱ्यावर होता. मात्र त्यांचा हिरमोड झाला. घरी आलेल्या मजुरांना जबरदस्तीने बसवण्यात आले. या दोघांचे हात बांधण्यात आले. त्यांना अतिशय वाईट वागणूक देण्यात आली. त्यावेळी चौघांनी मिळून अमानुषपणे मारहाण केली. एकजण हातातील दोरीने पाठीवर सटके लगावले तर अन्य तिघेजण हाताने दिसेल त्या जागेवर मारत होते. एवढ्यावरच आरोपी थांबले नाहीत. त्यांनी जातिवाचक शिवीगाळ दमदाटी केली. विकास नाईकवाडे आणि कसबे या दोघा मजुरांनी आपल्याला पहिल्यांदा गायब केल्याची तक्रार केली. भुताष्टे गावातील लाईट पोलचे मुकादम बालाजी मोरे यांच्याकडे विकास नाईकवाडे आणि कसबे हे दोघे मजूर मागील दोन महिन्यांपासून कामाला होते. कामाचे पैसे घ्यायला ये असे सांगून या दोघांना भुताष्टे येथे बोलावले. आरोपी बालाजी मोरे, भालचंद्र अनंत यादव यांच्यासोबत अन्य दोघे अशा चार जणांनी त्यांना डांबून ठेवून अमानुष मारहाण केली. माढा पोलिसांनी या प्रकरणी ४ जणांना अटक केली आहे.

विकास हे बालाजी मोरे यांच्याकडे जाऊन माझ्या कामाचे पैसे घेऊन येतो, असे आपल्या पत्नीला सांगून गेले होते. १५ ऑगस्ट रोजी घडलेला हा प्रकार मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर उघड झाला. दुसऱ्या दिवशी १६ ऑगस्ट रोजी संदीप लवटे हे घरी आले आणि सोनाली नाईकवडे यांना व्हिडिओ दाखवला. या व्हिडिओमध्ये विकास नाईकवडे (सोनालीचे पती) व सेवक कसबे या दोघांना बालाजी मोरे, भालचंद्र यादव व इतर दोन जण मारहाण करत असल्याचे दिसते. १७ ऑगस्ट रोजी माढा पोलीस ठाणे येथे चौघांविरुद्ध ॲट्रॉसिटी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



खड्डे चुकवणं दरवेळेस जमतंच असं नाही...

कल्याण
560-18-189

मेन बाजार
166-33-120

## फ्लॉवर विकला २, ६८४ रुपयांचा अन् व्यापाऱ्याने हातावर टेकवले ९.५० रुपये

### शेतीमालाला कस्पटासमान किंमत आल्याने शेतकरी हताश

✔ सुराज्य/सोलापूर

निसर्गाची अवकृपा, कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ अशा अनंत अडीअडचणींचा सामना शेतकऱ्यांना नेहमीच करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी ससेहोपालट ही काही नवीन बाब नाही. मात्र, या सगळ्या नैसर्गिक संकटांवर मात करून हिंमतीने पीक घेतले तरी बाजारात त्या मालाला कस्पटासमान किंमत मिळाल्याचा एक प्रकार नुकताच समोर आला आहे.



शेतकरी खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामांमध्ये शेती करतात. प्रत्येक ऋतूप्रमाणे शेतीत प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. तरकारी पिके काढण्याकडे त्याचा जास्त कल असतो. मात्र, अशा काही घटना घडतात ज्यामुळे शेतकऱ्याच्या पदरी निराशा येते. अशीच एक घटना शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथून समोर आली आहे. येथील शेतकऱ्याने दोन एकरमध्ये फ्लॉवरचे पीक घेतले. मात्र, हा फ्लॉवर तोडून जेव्हा मार्केटला व्यापाऱ्याकडे पाठवला तेव्हा त्याला या मालाची अवघी साडेनऊ रुपयांची पट्टी आली म्हणजे पैसे मिळाले. त्यामुळे शेती करायची की नाही असा प्रश्न आता शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. येथील शेतकऱ्याने उसाच्या पिकामध्ये आंतरपीक म्हणून फ्लॉवर हे पीक दोन एकरमध्ये घेतले होते. त्यात फ्लॉवरच्या सतरा पिशव्या त्यांनी मुंबई येथील वाशी मार्केटमध्ये व्यापाऱ्याकडे विक्रीसाठी पाठवल्या होत्या. त्यातून सर्व वजा जाता फक्त साडेनऊ रुपये विक्रीतून शेतकऱ्यांच्या हातात मिळाले. त्यामुळे शेतकऱ्याला हसावं की रडावं अशी त्याची परिस्थिती झाली आहे. मिळालेले ते साडेनऊ रुपये पुन्हा चेकद्वारे व्यापाऱ्याला पाठवणार असल्याचे संबंधित शेतकऱ्याने सांगितले आहे.



दोन एकर उसामध्ये आतंरपिक म्हणून फ्लॉवर लावला तो तोडणीस आल्यानंतर वाशी मार्केटला पाठविला त्यासाठी मला , बियाणे, खत, औषध फवारणी, तोडणी, वाहतूक खर्च झाला आहे. फ्लॉवर विक्री नंतर २६८४रुपये मालाची पट्टी तयार केली परंतु खर्च वजा करून व्यापाऱ्याने मला ९.५० रुपयांचा चेक दिला. तो चेक मी व्यापाऱ्याला परत देणार आहे. शेतकऱ्याचा उदरनिर्वाह हा शेतीवर असतो. घर खर्च मिळावा या उद्देशाने मिरची, भेंडी, वांगी, फ्लॉवर, टोमॅटो, कोबी आदी पिके घेत असतो परंतु फ्लॉवरचा खर्च वजा जाता केवळ साडे नऊ रुपये आल्याने माझे आर्थिक नुकसान तर झालेच आहे. एवढा खर्च करूनही हाती फक्त साडेनऊ रुपये आल्याने हताश झालो असून एवढा खर्च करूनही हाती काही न लागल्याने पीक घ्यावे की नाही असा प्रश्न माझ्यासमोर पडला आहे.

– **सूर्यकांत शेवाळे**, (फ्लॉवर उत्पादक शेतकरी)